## - जाहिर प्रगटन -

अनधिकृत धार्मिक स्थळांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. 104/2010, सोसायटी फॉर जस्टीस विरुध्द महाराष्ट्र शासन दाखल झाली होती. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. 01.10.2016 रोजी झालेल्या सुनावणीअंती निर्देश देऊन सार्वजनिक मालमत्ता, रस्ते, फुटपाथ यांच्यांवर कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिनांक 01.10.2016 रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र. 38 (m) व (n) येथे दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यांत येत आहे.

तरी या जाहिर प्रगटनाद्वारे नांदेड जिल्हयातील सर्व नागरिकांना जाहिर आवाहन करण्यांत येते की, सार्वजनिक मालमत्तेवर अथवा रस्ता किंवा फुटपाथ यावर उभारण्यांत येत असलेल्या अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बांधकामाबाबत काही तक्रार अगर हरकत असल्यास जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे स्थापन करण्यांत आलेल्या तक्रार निवारण कक्षाकडे तसेच या कार्यालयाचे ईमेल nandedrdc@gmail.com वर लेखी स्वरुपात व या कार्यालयाचे दूरध्वनी क्रमांक (02462) 235077 टोल फ्री क्रमांक 1077 वर संपर्क साधून तक्रार दाखल करावी.

स्थळ :- नांदेड

दिनांक :- 07.04.2017

**जिल्हाधिकारी नांदेड करिता**